# MET Bhujbal Knowledge City

## Institute of Engineering

एम.इ.टी./बी.के.सी./आय.ओ.ई./जा.क्र./ २३८      दि. ०३/१२/२०२५

OC

प्रती,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
सामनगाव रोड, नाशिकरोड,
नाशिक.

विषय : सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" ह्या विषयी जनजागृती ह्या उपक्रमाचा अहवाल सादर करणे बाबत..

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.९४/समन्वय, दि. १७.११.२०२५
२. संचालनालयाचे पत्र क्र. DTEM-D१६/११२/२०२५-DESK-१६, दिनांक २०.११.२०२५
३. या कार्यालयाचे पत्र क्र. तरि/विकाना/तांशा/२०२५/२७५२, दिनांक २१.११.२०२५
४. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशि/विकाना/तांशा/२०२५/२७५१, दिनांक २१.११.२०२५

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार प्रत्येक महाविद्यालयात मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी :- "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" ह्या विषयी जनजागृती करणे हा अभियान साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या होत्या , तरी वरील सुचनेनुसार या विशेष उपक्रमाचे आयोजन मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथे सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता, "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" ह्या विषयी जनजागृती पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता तसेच आपण दिलेल्या गुगल लिंक ह्या मार्फत विद्यार्थ्यांना माहिती भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा अहवाल आपणास सविनयसादर करीत आहोत.

कळावे,

MET's Institute of Engineering ADGAON, NASIK-3 Bhujbal Knowledge City

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य

Adgaon, Nashik - 422 003
Mobile : (91) 09881100099 | Tel. : (0253) 2303515 | Telefax : (0253) 2303203
E-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbhujbalknowledgecity.ac.in
ISO 9001-2008 certified MET is an NGO in Special Consultative Status with United Nations (ECOSOC)

**INTERNAL NOTE**

| |
|---|
| Ref. No:- BKC/MET/IOE/Library/2025-26 |
| From:- Dr. Sambhaji Patil (Librarian) |
| To: - All Heads, MET-BKC-IOE, Nashik |
| Through: - Principal, MET-BKC-IOE, Nashik |
| Ref.:- तंशि/विकाना/तांशा/२०२५/२७५१, दिनांक- २१.११.२०२५ |
| Sub.: सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी:- "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" ह्या विषयी जनजागृती करणे बाबत... |
| Date:- २८ नोव्हेंबर २०२५ |

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रकानुसार सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" जनजागृती ह्या विषयी माहिती द्यावी म्हणून एक व्याख्यान आयोजित करणे असे कार्यक्रम साजरा करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

उपरोक्त विषयास अनुसरून विद्यार्थ्यांची भारतीय संविधानाच्या इतिहास व संरचनेची समज वाढविणे, संविधानाविषयी गैरसमज दूर करणे, तसेच युवकांमध्ये संविधानाविषयी जागृती निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - २०२५" हा कार्यक्रम युवा करियर, नागपूर यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला आहे. दिनांक १६.०९.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तात खालील निर्देश देण्यात आले आहेत:

- विद्यार्थ्यांसाठी उपक्रमाची सविस्तर माहिती कळविणारे परिपत्रक जारी करणे व जास्तीत जास्त सहभागासाठी आवाहन करणे.
- संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर संविधान प्रश्न मंजुषा - २०२५ या आयोजनाची माहिती प्रसारित करणे.
- विद्यार्थ्यांना खालील लिंकवर नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करणे :
  Google Link: https://yuvacareer.com/indian-constitution-awareness-quiz/

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या निर्देशानुसार आपल्या विभागा मार्फत आवश्यक कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. वरील सूचनेनुसार सोमवार दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा प्रथम वर्ष अभियांत्रिकी क्लास रूम मध्ये "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" जनजागृती ह्या विषयी माहिती या विषयावर जनजागृती करण्यात येणार असून, खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने आपण सर्वांनी ह्या कार्यक्रमास उपस्थित रहावे. सर्व प्रमुख, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवावा, तुमची उपस्थिती हीच कार्यक्रमाची यशस्वीता आणि शोभा आहे.

☐ दिनांक: १ डिसेंबर २०२५, (सोमवार), ☐ वेळ: सकाळी ११.०० वा.

डॉ. संभाजी पाटील
ग्रंथपाल

प्रा. योगेश पाटणी
राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी

MET's Institute of Engineering, ADGAON, NASIK-3, Bhujbal Knowledge City

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य

प्रत : सर्व विभाग प्रमुख

दिनांक 2 डिसेंबर २०२५

अहवाल - "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५" - सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५

दिनांक : १ डिसेंबर २०२५ ,

आयोजक : राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग

**आयोजक:** राष्ट्रीय सेवा योजना आणि **मध्यवर्ती ग्रंथालय, एमईटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक**

भारतीय संविधान हे भारतीय प्रजासत्ताकाचे मूलभूत कायदेशीर दस्तऐवज व देशाच्या प्रशासनाचे सर्वोच्च मार्गदर्शक तत्त्व आहे. २६ जानेवारी १९५० पासून अमलात आलेल्या संविधानाने जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही राष्ट्राला दिशा दिली. आजच्या युवक पिढीसमोर संविधानाचा इतिहास, रचना, अधिकार-अधिकार, कर्तव्ये आणि मूल्ये जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी विविध शैक्षणिक संस्थांमार्फत नियमितपणे संविधान जागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन परिपत्रकानुसार **सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५** रोजी राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये **"भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा"** हा उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार **एमईटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक** येथे याबाबत सविस्तर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासंबंधी खालील शासकीय व संस्थात्मक संदर्भ प्राप्त झाले, १. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.९४/समन्वय, दिनांक १७.११.२०२५, २. संचालनालय तांत्रिक शिक्षण विभाग, मुंबई, पत्र क्र. DTEM-D१६/११२/२०२५-DESK-१६, दिनांक २०.११.२०२५, ३. तरि/विकाना/तांशा/२०२५/२७५२, दिनांक २१.११.२०२५, ४. क्र. तंशि/विकाना/तांशा/२०२५/२७५१, दिनांक २१.११.२०२५, वरील पत्रानुसार महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना संविधानाविषयी जागृती निर्माण करणे, ज्ञान वाढविणे व सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे यासंबंधी आदेश देण्यात आले.

"भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५" या उपक्रमाद्वारे खालील उद्दिष्टे साध्य करणे अपेक्षित होते:

- विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचा इतिहास, बनावट, तत्त्वज्ञान व मूलभूत मूल्ये शिकविणे.
- लोकशाही, स्वातंत्र्य, समानता, बंधुता, न्याय या तत्त्वांबद्दल जागरूकता निर्माण करणे.
- युवकांमध्ये राजकीय व सामाजिक उत्तरदायित्वाची भावना दृढ करणे.
- संविधानाशी संबंधित चुकीचे गैरसमज व अफवा दूर करणे.
- आधुनिक काळातील नागरिक म्हणून आपली कर्तव्ये व जबाबदारी समजावून देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकतेची भावना वाढवून त्यांच्या ज्ञानसंवर्धनास प्रोत्साहन देणे.

खालील सूचना देण्यात आल्या: तयारीसाठी केल्या गेलेल्या प्रमुख उपाययोजना:

- सर्व विभागांना लिखित सूचना देण्यात आल्या.
- विद्यार्थ्यांसाठी सहभाग परिपत्रक प्रसारित केले.
- संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपक्रमाची माहिती प्रकाशित करण्यात आली.
- सहभागासाठी मोबाइल / संगणकावर ऑनलाइन नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.
- **Google Registration Link** सर्व विद्यार्थ्यांना पाठवण्यात आला: https://yuvacareer.com/indian-constitution-awareness-quiz/
- राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागामार्फत जनजागृती मोहीम राबविण्यात आली.
- पोस्टर, बॅनर आणि सोशल मीडियाद्वारे प्रबोधन करण्यात आले.

**कार्यक्रमाची अंमलबजावणी**

**दिनांक:** १ डिसेंबर २०२५

**वेळ:** सकाळी ११.०० वा.

**स्थळ:** प्रथम वर्ष अभियांत्रिकी क्लास रूम, **एमईटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११.०० वाजता राष्ट्रगीताने झाली. यानंतर प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी उद्घाटनपर भाषण केले. कार्यक्रमात पाहुणे वक्त्यांनी खालील मुद्दे प्रतिपादित केले:

- संविधान हे कायद्याचे फक्त पुस्तक नसून सामाजिक न्यायाचे शास्त्र आहे.
- प्रत्येक युवा नागरिकाने संविधान वाचणे, जाणून घेणे अत्यावश्यक आहे.
- आजच्या डिजिटल युगात माहितीचे खरे-खोटे स्वरूप ओळखणे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे आहे.
- अधिकार आणि कर्तव्ये समतोल ठेवणे हीच खरी लोकशाही.

कार्यक्रमाची सांगता डॉ. संभाजी पाटील (ग्रंथपाल) यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी संविधानाच्या रचनेमागील तत्त्वज्ञान व देशाच्या सर्वांगीण विकासात संविधानाची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर प्रा. योगेश पाटणी (NSS अधिकारी) यांनी युवकांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल मार्गदर्शन केले.

**विद्यार्थ्यांचा सहभाग**

- एकूण नोंदणी : ७६२ विद्यार्थी
- प्रत्यक्ष क्विझ सहभाग : ६८९ विद्यार्थी
- ९८% विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.
- ६५% विद्यार्थ्यांना संविधानाच्या माहितीमध्ये चांगली वाढ झाल्याचे नमूद केले.

"भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा – २०२५" हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. कार्यक्रमातील उत्साही सहभाग व विद्यार्थ्यांचे सकारात्मक प्रतिसाद यामुळे संस्थेची शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रतिमा अधिक भक्कम झाली. युवकांनी आगामी काळातही संविधानिक मूल्यांचे संवर्धन करावे आणि राष्ट्रीय विकासात योगदान द्यावे हीच अपेक्षा.

विद्यार्थी आणि सर्व विभाग प्राध्यापकांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

समारोप सत्रात प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी सर्वांचे आभार मानून भविष्यामध्येही अशा सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले. प्रा. योगेश पाटणी यांनी समन्वयक म्हणून कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण झाल्याबद्दल सर्वांच्या सहकार्याचे कौतुक केले. डॉ. संभाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या प्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख आणि प्राध्यापक वर्ग देखील उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. श्यामकुमार काळपांडे, डॉ. विठ्ठल गोंड, डॉ. शामराव गुमास्ते, डॉ. प्रशांत यावलकर, डॉ. पवन घुमरे, डॉ. दीपक कदम, डॉ. पुंडलिक जाधव, डॉ. विनोद खैरनार आणि डॉ. नमिता काळे यांचा सक्रिय सहभाग होता. ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील यांनी सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी यांचे मनःपूर्वक आभार मानले





MET's Institute of Engineering
ADGACN, NASIK-3
Bhujbal Knowledge City

| डॉ. संभाजी पाटील | प्रा. योगेश पाटणी | डॉ. विजयकुमार वाणी |
| --- | --- | --- |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |